# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय

## फुलंब्री जि. औरंगाबाद

# योगसमिती

**शै. वर्ष :- २०१८-१९**

प्रमुख

डॉ. राजश्री पवार

प्राचार्य

डॉ. एस. आर. टकले

**श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री**
**योग समिती**
**अहवाल : २०१८-१९**

**योगदिन:-**

दि. २१ जून २०१८ रोजी जागतिक योगदिन महाविद्यालयात साजरा करण्यात आला. क्रीडा विभाग, एन.एस.एस. व योग समितीच्या वतीने ह्या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी श्री. चंद्रकांत कदम (योगशिक्षक, पतंजली योग समिती, औरंगाबाद) यांनी योगाचे प्रशिक्षण दिले. विविध आसने, प्राणायाम, ध्यान घेण्यात आले. विद्यार्थीवर्ग, कर्मचारी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

**योगशिबिर:**

दि. ०४ डिसेंबर २०१८ ते १३ डिसेंबर २०१८ या कालावधीत विद्यार्थ्यांसाठी योग शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. दि. ०४ डिसेंबर २०१८ रोजी शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी श्री. गणेश कुलकर्णी (ग्रंथपाल, प्रस्तुत महाविद्यालय) हे उपस्थित होते. याप्रसंगी त्यांनी उपस्थितांना शिरिशाषन तसेच सर्वांगासन करुन दाखविले व योगाचे महत्त्व पटवून दिले. डॉ. राजश्री पवार यांनी दि. ०४ डिसेंबर २०१८ ते १३ डिसेंबर २०१८ या कालावधीत दुपारी ३:२० ते ५:०० या कालावधीत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्रत्यक्ष आसने, प्राणायामाचे प्रशिक्षण देण्यात आले. यामध्ये २० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

**योग शिक्षक प्रशिक्षण प्रमाणपत्र वर्ग:-**

दि. १८ फेब्रुवारी २०१८ ते दि. १९ मार्च २०१९ या कालावधीत वर्ग आयोजित करण्यात आला. यात एकण २७ महिलांचा सहभाग होता. योग वर्गाचे उद्घाटन दि. १६ फेब्रुवारी २०१९ रोजी श्री. सुरेश मिरकर (सचिव, जिल्हा योग संघटना, औरंगाबाद) यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच प्रमुख उपस्थिती म्हणून श्रीमती उषा पालोदकर (सहसचिव, औरंगाबाद जिल्हा, योग संघटना) ह्या होत्या. मार्गदर्शक म्हणून कु. प्रमिला आव्हाले (योग शिक्षक, योग विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद) ह्या उपस्थित होत्या. याप्रसंगी शाळकरी मुलींनी संगीत योगाचे प्रात्यक्षिक करुन दाखविले. महिनाभर घेण्यात येणाऱ्या ह्या योग वर्गात विविध योगाचार्यांनी येऊन लाभार्थ्यांना मार्गदर्शन केले.

त्याचा सविस्तर स्वतंत्र असा अहवाल जोडण्यात आला आहे.

—x—

प्रा. पवार आर. पी.

योग दिन (दि. 21.06.2018)







योग दिनानिमित्त प्रशिक्षण देताना
श्री. चंद्रकांत कदम व डॉ. संदिप जगताप
व प्रशिक्षणार्थी

योग शिबिर (दि. 4-13 Dec 2018)







योग शिबिराचे उद्घाटन करताना डॉ. गणेश कुलकर्णी



योग शिबिरात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ. राजश्री पवार